# नागपूर हिवाळी अधिवेशन २०१३

## ससून रूग्णालयातील ट्रॉमा केअर युनिट व कॅथलॅब पूर्ववत सुरू करण्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) पुणे येथील ससून रूग्णालयात ट्रॉमा केअर युनिट व कॅथलॅब पूर्ववत सुरू करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

ससून रूग्णालयात ट्रॉमा केअर सेंटरमध्ये अनेक गैरसोयीमुळे हे सेंटर बंद असून कॅगच्या अहवालात या प्रकरणी शेरे मारण्यात आल्याचे ऑक्टोंबर २०१३ मध्ये निदर्शनास आले आहे, तसेच या रूग्णालयामध्ये ह्दय रोगावर उपचार करणाऱ्या कॅथलॅबमध्ये बिघाड झाल्यामुळे व लॅबची उपकरणे अद्यावत न केल्याने बऱ्याच वेळा ही उपकरणे नादुरूस्त झाल्याने ह्दयविकारावर उपचार करणे बंद झाले असून ह्दय विकाराच्या गरीब आणि गरजू रूग्णांना ससून रूग्णालयात उपचार न झाल्याने खाजगी रूग्णालयात उपचार करावे लागत आहे तसेच नविन कॅथलॅबबाबतचा पाच कोटी रूपयांचा प्रस्ताव शासनाकडे अद्यापही प्रलंबित आहे, याबाबत शासनाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने या रूग्णालयातील ट्रॉमा केअर सेंटर व कॅथलॅब पूर्व वत सुरू करण्यासह सलाईन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

ससून रूग्णालयातील कॅथलॅब मशीन जूनी झाल्याने वारंवार बंद पडते तथापि तातडीने दुरूस्ती करून घेण्यात येवून कार्यान्वित करण्यात येते. नविन मशिन खरेदीसाठीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नसून या प्रकरणाच्या चौकशीनुसार ससूनमधील ट्रॉमा सेंटर करीता यंत्रसामुग्री खरेदीची प्रकिया सुरू आहे. हे सेंटर अद्याप सुरू झालेले नाही, तसेच कॅगचा अहवाल संस्थेस प्राप्त झालेला नाही. ससून रूग्णालयामध्ये रूग्णसेवेकरीता आवश्यक सलाईन तसेच अन्य बाबी मुबलक प्रमाणात उपलब्ध असून रूग्णांना आवश्यक सेवा देण्यात येत आहेत, असे लेखी उत्ततर वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी दिले आहे.

## साथींच्या रोगांबाबत करावयाच्या उपाययोजनेबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यात पसरलेल्या विविध साथींच्या रोगांबाबत करावयाच्या उपाययोजनेबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्यात विशेषतः पुणे, मुंबई, रायगड, अहमदनगर, भंडारा, यवतमाळ, अकोला, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, सिंधुदुर्ग, ठाणे, नवी मुंबई, लातूर, जळगांव जिल्हयामध्ये डेंग्यू, स्वाईन फ्लू, लेप्टो, कावीळ, विषमज्वर, मलेरिया, गॅस्ट्रो इत्यादी किटकजन्य साथीच्या रोगांची लागण झाल्याने रूग्णांचे मृत्यू झाल्याचे जून ते ऑक्टोंबर २०१३ मध्ये निदर्शनास आले आहे. याबाबत शासनाने केलेल्या चौकशीच्या निष्कर्षानुसार काय उपापयोजना केल्या तसेच वारंवार उदभवणाऱ्या साथींच्या रोगांना कायमस्वरूपी आळा घालण्याबाबत त्याचबरोबर डेंग्यू साथीचा प्रार्दुभाव होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आरोग्य विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

राज्यात पुणे, मुंबई, रायगड, अहमदनगर, भंडारा, यवतमाळ, अकोला, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, सिंधुदुर्ग, ठाणे, नवी मुंबई, लातूर, जळगांव जिल्हयामध्ये डेंग्यू, स्वाईन फ्लू, लेप्टो, कावीळ, विषमज्वर, मलेरिया, गॅस्ट्रो इत्यादी किटकजन्य साथीच्या रोगांची लागण झाल्याने रूग्णांचे मृत्यू झाल्याची बाब अंशतः खरी असून या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. राज्यात जून ते ऑक्टोंबर २०१३ या कालावधीत डेंग्यू आजाराची १६१५ जणांना, २६० जणांना स्वाईन फ्ल्यू, ११० जणांना लेप्टोस्पायरोसिस, ८३० जणांना काविळ, ९२४ जणांना विषमज्वर, २३ हजार ५६७ जणांना मलेरिया तर ६९७४ जणांना गॅस्ट्रोची लागण झाली होती. यामधील डेंग्यूने ३६, स्वाईन फ्लूने ६४, लेप्टोस्पायरोसिसने ०८, काविळने ०५, मलेरियाने ३९ तर गॅस्टोने ०५ जणांचा मृत्यू झाला. राज्यात जलजन्य, किटकजन्य व इतर साथरोगांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी साथरोगांचे दैनंदिन सर्व्हेक्षण, साथरोग निदानासाठी प्रयोगशाळांची सुविधा, सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक ऑषधांची उपलब्धता, पाणी गुणवत्ता नियंत्रण, पाणी शुध्दीकरणाकरिता वापरण्यात येणाऱ्या ब्लिचिंग पावडरचे गुणवत्ता नियंत्रण, एकात्मिक किटक व्यवस्थापन, किटकजन्य रोग नियंत्रण पंधरवडयाचे आयोजन, साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी आंतरविभागीय समन्वय, विविध साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी आरोग्य शिक्षण

अशा विविध उपाययोजना राबविण्यात येतात. डेंग्यू साथीच्या ठिकाणी सर्व उपाययोजना रबविण्यात आल्या व येत असल्याने दुर्लक्ष झालेले नाही., असे लेखी उत्तर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री सुरेश शेट्टी यांनी दिले.

## शासकीय रूग्णालयातील बदली कामगारांना कायम करण्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यातील वैदयकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शासकीय रूग्णालयातील बदली कामगारांना कायम करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्यभरात वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या अखत्यारितील शासकीय रूग्णालयामध्ये २५ वर्षे काम करणाऱ्या बदली कामगारांना कायमस्वरूपी करण्याकरिता दिनांक ५ डिसेंबर १९९६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असतानाही अदयापपर्यंत त्याची अमंलबजावणी झाली नसल्याचे ऑगस्ट २०१३ मध्ये निदर्शनास आले. मुंबई व ठाण्यात विविध रूग्णालयामध्ये सुमारे २५०० पदे रिक्त असल्याचे आढळून आले असून राज्यातील शासकीय वैदयकीय महाविदयालयतील आणि शैक्षणिक रूग्णालयातील चतुर्थश्रेणी बदली कर्म चाऱ्यांना नियमित करण्याबाबत लोकप्रतिनिधी (कसबापेठ) यांनी दिनांक २९ एप्रिल २०१३ रोजी मा.प्रधान सचिव, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, तसेच आपल्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी पुणे शहरातील ससून रूग्णालयातील चतुर्थ श्रेणीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांनी ऑक्टोंबर २०१३ मध्ये काम बंद आंदोलन केले होते, या बदली कामगारांना रिक्त असलेल्या पदावर नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

मुंबईतील शासकीय महाविदयालये व रूग्णालयांमध्ये वर्ग -४ सवर्गातील ८१३ व सफाईगारांची १८१ अशी एकूण ९९४ पदे रिक्त आहेत. ठाणे शहरातील शासकीय रूग्णालये या विभागाच्या नियंत्रणाखाली येत नाहीत. राज्यातील शासकीय वैदयकीय महाविदयालयतील आणि शैक्षणिक रूग्णालयातील चतुर्थश्रेणी बदली कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत लोकप्रतिनिधी (कसबापेठ) यांनी दिनांक २९ एप्रिल २०१३ रोजी मा.प्रधान सचिव, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली होत ही बाब खरी आहे. पुणे येथील ससून रूग्णालयातील बदली कर्मचाऱ्यांनी दि.७ ऑक्टोबर २०१३ रोजी काम बंद आंदोलन केले होते. बदली कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे, असे लेखी उत्तर वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी दिले आहे.

## राज्यातील पर्यावरण कायदयाचे उल्लंघन करून केलेल्या बांधकामांना प्रतिबंध करण्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यातील पर्यावरण कायदयाचे उल्लंघन करून केलेल्या बांधकामांना प्रतिबंध करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

केंद्रीय पर्यावरण कायदयाचे उल्लंघन करून अनेक विकासकांनी मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी सुरू केलेल्या कोटयवधी रूपयांच्या गृहनिर्माण व व्यापारी प्रकल्पांच्या बांधकामांना प्रतिबंध करण्यास राज्याच्या पर्या वरण विभाग अपयशी ठरत असल्याचे ऑगस्ट २०१३ मध्ये निदर्शनास आले तसेच राज्यात १ लाख कोटीचे प्रकल्प केंद्रात पर्यावरण विभागाच्या परवानगी अभावी प्रलंबित असल्याची माहिती ऑक्टोबर २०१३ मध्ये निदर्शनास आली, राज्यातील नविन बांधकाम प्रकल्पांना पर्यावरण विभागाचे प्रमाणपत्र मिळत नसल्याने मुंबई व्यतिरिक्त राज्यभरातील ८८३ प्रकल्प गेल्या काही वर्षापासून मंजूरीच्या प्रतिक्षेत असून त्यापैकी ५०४ गृहनिर्मा ण प्रकल्पाचा समावेश असल्याने त्यांचे पाच लाख घरांचे ५० कोटी चौ.फुटाचे बांधकाम थांबले आहे, राज्यातील बांधकाम प्रकल्पांबाबत पर्यावरण नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी केंद्राने पर्यावरण विषयक तज्ञांच्या दोन समित्या व एका प्राधिकरणाची स्थापना केली असून केंद्र सरकारने नेमलेल्या राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समितीच्या अध्यक्षांसह ६ सदस्यांनी राजीनामे दिले. उच्चाधिकार प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनीही राजीनामा दिल्यामुळे राज्यातील जवळपास ५०० पेक्षा अधिक गृहनिर्माण प्रकल्प प्रलंबित आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार कायदयाचे उल्लंघन केलेल्या बांधकामांना आळा घालण्याबाबत आणि नवीन बांधकामांना परवानग्या देण्याबाबत तसेच केंद्राकडे प्रलंबित असलेल्या

प्रस्तावांचा पाठपुरावा करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

पर्यावरण संरक्षण कायदयाअंतर्गत २००७ प्राप्त प्रस्तावांपैकी १३७८ प्रस्तावांचे नियमाप्रमाणे शिफारस झाली असून मुंबई महानगर क्षेत्रातील ७० व मुंबई व्यतिरिक्त ५५९ प्राप्त प्रकल्पांवर नियमानुसार कार्यवाही चालू आहे. तथापि, राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण व तज्ञ समित्यांचे गठण राज्य शासनाच्या शिफारशी नंतर केंद्र शासनाद्वारे करण्यात येते. सदयः स्थितीत राज्यात एक प्राधिकरण व बांधकाम प्रकल्पांसाठी २ समित्यांचे गठण नुकतेच केलेले असून या समित्यांद्वारे प्रकरणांचा निपटारा नियमाप्रमाणे करण्यात येत आहे.तसेच राज्य शासनाने या व्यतिरिक्त उदयोगांसाठी स्वतंत्र समितीची शिफारस केंद्र शासनास केली असून तिचे केंद्र शासनाद्वारे गठण करण्यात येत आहे, असे लेखी उत्तर पर्यावरण मंत्री संजय देवतळे यांनी दिले आहे.